अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार, दि. ३० सप्टेंबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : २ रा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## पोलिसासह दोघांकडून एकाची फसवणूक



सोलापूर : दुकान गाळ्यावर कर्ज मंजूर करून देतो म्हणून पोलिसासह एका महिलेने दुकान मालकाची १ लाख ६५ हजार रूपये घेऊन फसवणूक केल्याची घटना उघड झाली. ही घटना दि. १ जून २०२२ पासून घडली आहे.

शिवकुमार बसवराज सुरपूर (वय ५९, रा. ७३७ वॉर्ड नं.१३, विद्या नगर, सिंदगी रोड, ता.इंडी,जि. विजापूर) यांनी फिर्याद दिली आहे. शिवकुमार यांच्या मालकीचे न्यु पाच्छा पेठेत मड्डुर कॉम्प्लेक्स या इमारतीमध्ये दुकान गाळा असून त्या गाळ्यावर कर्ज प्रकरण मंजुर करून देतो असे म्हणून आरोपी पोलीस नाईक अनिल बसवराज गवसाने (रा. जुळे सोलापूर सध्या नेमणूक सदर बझार पोलीस ठाणे) आणि स्वाती सूर्यकांत घाडगे (रा. सातरस्ता सोलापूर) या दोघांनी मिळून खोटे आश्वासन देत १ लाख ६५ हजार रूपये घेतले आणि ते परत न देता शिवीगाळ आणि दमदाटी केली तसेच खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकि देऊन आर्थिक फसवणूक केली. अशी फिर्याद शिवकुमार सुरपूर यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात दिली आहे. पुढील तपास स.पो.नि. दिनेश कुलकर्णी करीत आहेत.

# नार्वेकरांच्या 'मुसक्या' आवळण्यासाठी ठाकरे गटाने नवे 'अस्त्र' उगारले

## ● कोर्टात प्रतिज्ञापत्र दाखल केल्याने अपात्रता प्रकरणाला वेगळे वळण

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांचे प्रतिस्पर्धी उद्धव ठाकरे यांच्यात आमदार अपात्रता प्रकरणावरून सुरू असलेला संघर्ष विकोपाला जाणार अशी चिन्हे दिसत आहेत. सुप्रीम कोर्टाने आदेश देवूनही सभापती राहुल नार्वेकर यांच्याकडून चालढकल केली जाणार हे लक्षात आल्याने ठाकरे गटाच्या अंगाचा तीळपापड व्हायला लागला आहे. नार्वेकर यांच्या वेळकाढूपणाच्या नीतीला लगाम लावण्यासाठी ठाकरे गटाने एक नवा प्लॅन आखला आहे. त्यातून नार्वेकरांचा मुसक्या आवळल्या जातील, असा विश्वास ठाकरे गटाला लागून आहे. त्यातूनच या गटाकडून सुप्रीम कोर्टात नार्वेकर यांच्याविरूद्ध प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले आहे. त्यांच्या वेळापत्रकाला त्यात आक्षेप घेण्यात आला आहे. त्यामुळे नव्या मैदानात पुन्हा कोण बाजी मारणार याविषयी राज्यात नवी उत्सुकता निर्माण झाली आहे.

मागच्या सोमवारी झालेल्या सुनावणीत काहीच निष्पन्न झाले नाही. नार्वेकर यांनी साक्षीदार आणि उलट तपासणी या बाबी पुढे करून सुनावणी लांबणीवर टाकली. तेरा ऑक्टोबरला पुढची सुनावणी ठेवली. सोमवारच्या सुनावणीत एकत्रित सुनाणी घ्या,असा ठाकरे गटाचा अट्टाहास होता तर शिंदे गटाकडून त्याला विरोध झाला. नार्वेकरांकडून निकाल द्यायला विलंब होत असल्याची तक्रार ठाकरे गटाकडून केली गेली तसेच जानेवारीपर्यंत निकाल लागूच शकणार नाही,असा तर्क जाणकारांनी काढला. त्यामुळे ठाकरे गट धास्तावला आहे. नार्वे करांना आवर घालण्यासाठी गेल्या चार- पाच दिवसात नवा प्लॅन शोधला गेला.नामवंत वकिलांशी चर्चा करून हे प्रतिज्ञापत्र दाखल केल्याचे सांगण्यात येते.

विधानसभा अध्यक्षांनी जाहीर केलेल्या वेळापत्रकावर ठाकरे गटाने आक्षेप घेतला आहे. अपात्रता मुद्दा सोडून इतर विषयात अध्यक्ष वेळ घालवत आहेत, असा आरोप ठाकरे गटाचा आहे. विधानसभा अध्यक्षांनी जाहीर केलेले वेळापत्रक आणि होणारा विलंब पाहता ठाकरे गट थेट सुप्रीम कोर्टात गेला आहे.



**'टाईमपास'चा वाचला पाढा :** ४ महिने उलट तपासणी, ४ महिने साक्ष अन् आठवड्यातून दोनदाच, परबांनी सांगितली नार्वेकरांचे 'ते' डावपेच. ते नेमके म्हणाले, न्यायालयाने १६ आमदारांचे प्रकरण एकत्र ऐकले. दुसरीकडे न्यायालयाच्या खाली असलेले विधानसभा अध्यक्षांचे हे न्यायालय प्रत्येक आमदाराची याचिका वेगवेगळी ऐकण्याच्या मनस्थितीत आहे. त्याबाबत निर्णय झालेला नाही. मात्र, असे करून वेळकाढूपणाचे धोरण आहे. व्यवस्थित बघितले तर लक्षात येईल की, २३ नोव्हेंबरपर्यंत त्यांनी तारखा कळवल्या आहेत. २३ नोव्हेंबरनंतर उलट तपासणी सुरू होणार. उलट तपासणी कुणाची, कशासाठी, किती काळ चालणार याविषयी काहीही म्हटले नाही उलट तपासणी संपल्यावर दोन आठवड्यांनी ते निकाल देणार आहेत. कदाचित ते उलट तपासणी चार महिने चालवतील. साक्ष चार महिने चालवतील. सुनावणी आठवड्यातून दोनदाच घ्यायची आहे. ४० लोकांची सुनावणी घ्यायची आहे. त्यात वेळ वाढवून मागितला जाईल आणि वेगवेगळे डावपेच टाकून हे प्रकरण लांबवण्याचे प्रयत्न चालू आहेत. सगळ्यांचा गुन्हा सारखा आहे. त्यामुळे वेगवेगळी सुनावणी घेण्याची गरज नाही.सर्वांना हे मान्य असताना राज्यपालांना साक्षीला बोलावणार आहेत का? मुख्यमंत्र्यांनी शपथ घेतली हे सर्वमान्य तथ्य आहे आता मुख्यमंत्र्यांना शपथविधीला बोलावणार का?

**आदित्य ठाकरेंचे टीकास्त्र :** दरम्यान, या सुनावणीनंतर शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यावर टीकास्त्र सोडलं. राहुल नार्वेकर यांनी शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणाच्या सुनावणीचं वेळापत्रक सर्व आमदारांना पाठवल्यानंतर, ठाकरे गटाच्या आमदारांकडून आक्षेप घेतला गेला आहे. या सगळ्या सुनावणीच्या प्रक्रियेत वेळकाढूपणा करणं म्हणजे घटनेच्या विरोधात असलेल्यांना एक प्रकारे संरक्षण देण्याचं, काम अध्यक्ष करत असल्याची टीका आदित्य ठाकरे यांनी ट्विट द्वारे केली.

**नार्वेकर विदेशात :** नार्वेकर हे ६६ व्या राष्ट्रकुल परिषदेस उपस्थित राहण्यासाठी ३० सप्टेंबर ते ६ ऑक्टोबर या कालावधीत घाना दौऱ्यावर जाणार आहेत. आमदार अपात्रता याचिकांवरील सुनावणी प्रलंबित असताना नार्वेकर दौऱ्यावर जात असल्याने वाद सुरु झाला आहे. राज्यात घटनाबाह्य सरकार सत्तेवर असताना व त्यांना संरक्षण दिले जात असताना नार्वेकर हे कोणत्या नैतिकतेने परिषदेत प्रतिनिधीत्व करणार आहेत, असा सवाल करीत शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी टीकास्त्र सोडले आहे. लोकशाहीची तत्त्वे न पाळता परदेश दौरा करणे हे अयोग्य ठरेल, असेही ठाकरे म्हणाले.

## २४ तासात चोरट्याला लॉजमधून अटक; साडेपाच लाखांची रोकड जप्त

सुराज्य/सोलापूर

दरवाजा उघडा असल्याची संधी साधत आज्ञात चोरट्याने घरातील कॉटवर असलेली ५ लाख ६० हजार रुपये चोरून पोबारा केला होता.परंतु फौजदार चावडी पोलीस ठाण्याच्या गुन्हे शाखेच्या पथकाने दमदार कामगिरी करत केवळ २४ तासाच्या आत जवळच असलेल्या लॉज मध्ये लपलेल्या चोरट्यास अटक करून त्याच्या ताब्यातील सर्व रोकड जप्त केली.

मोहसिन आयुब शेख (वय-२५,रा.लोहारा,उस्मानाबाद) यांचे मोबाईल विक्रिचे दुकान आहे. नेहमी प्रमाणे ते सकाळी नऊ वाजता घराचा दरवाजा उघडून साफसफाई करत फ्रेश होण्यासाठी बाथरूम मध्ये गेले असताना चोरटा ही संधी साधत कॉटवर असलेली पैशाने भरलेली बॅग घेऊन पसार झाला. या बाबत फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

जुना पूना नाका येथील समर्थ लॉज येथे अफताब सत्तार अत्तार हा चोरीची रोख रक्कम घेऊन थांबला आहे, अशी माहिती पोलिसांना मिळाली. फौजदार चावडी पोलीस ठाण्याचे गुन्हे शाखेचे पथक त्या ठिकाणी पोहोचले.समर्थ लॉज मधील रजिस्टर तपासून त्यांनी त्या रूममध्ये धाव घेतली. पोलिसांना पाहून तो पळून जात असताना,त्याला पकडले. पोलिसांनी त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव अफताब सत्तार अत्तार, (वय-२३ रा.काळे प्लॉट, उमरगा) असे असल्याचे सांगितले त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली.

ही कामगिरी फौजदार चावडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षकविश्वनाथ सिद,पो. नि.विकास देशमुख, यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे प्रमुख सहा.पोलीस निरीक्षक शंकर धायगुडे,प्रविण चुंगे,अजय पाडवी,रविंद्र परबत,विनोद व्हटकर,कृष्णाथ बडुरे, सचिनकुमार लवटे, अजय चव्हाण,विनोद पुजारी,पंकज घाडगे,सुधाकर माने, तौसिफ शेख,अमोल खरटमल, शशिकांत दराडे,नागनाथ गुळवे यांनी केली आहे.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार प्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल

सुराज्य/अक्कलकोट

### व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी



एका १७ वर्षाच्या मुलीवर वारंवार अत्याचार करून आक्षेपार्ह व्हिडिओ काढुन व्हायरल करण्याची धमकि देऊन वारंवार अत्याचार केल्याबद्दल व आरोपींना मदत केल्याबद्दल येथील उत्तर पोलीस स्टेशनमध्ये तियांविरूद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

प्रदीप गुंडाप्पा ब्याळे (रा.जहाँगीर चिंचोळी, ता उमरगा जि उस्मानाबाद), संदिप मनोहर वाकडे, सिध्दाराम जगन्नाथ लवटे (दोघे रा. अक्कलकोट) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. ही घटना पिडीत मुलीच्या गावी ५ सप्टेंबर २०२२ रोजी दुपारी एक वाजताच्या दरम्यान घडली.

पिडिता घरी असताना दुपारी आरोपी प्रदीप यान तिला उसाच्या शेतामध्ये भेटायला बोलवले. ती गेली असता जबरदस्तीने तिच्याशी शारीरिक संबंध केले. पिडीता घाबरलेली असल्याने तिने याबाबत कोणाला काही सांगितले नाही. त्यानंतर दोन ते तीन महिन्यानंतर आरोपी प्रदीप याने दोन ते तीन वेळा तिच्यावर अत्याचार केला.

त्यानंतर ५ सप्टेंबर २०२२ रोजी पिडिता कॉलेजला आली असता आरोपी प्रदीपने अक्कलकोट-सोलापूर रोडवर शेतामध्ये अत्याचार केला. त्यावेळी आरोपीचे मित्र संदिप वाकडे व सिध्दाराम लवटे हे रोडवर उभे राहुन लक्ष ठेवत होते. तसेच आरोपी प्रदीप आक्षेपार्ह व्हिडीओ, फोटो व्हायरल करण्याची धमकि पिडीतेला देत होता. अखेर पिडीतेने पोलिस ठाणे गाठून तियांविरोधात फिर्याद दिली. तिन्ही आरोपींना पोलीसांनी ताब्यात घेतले आहे. पुढील तपास पो.स.ई अजित मोरे हे करीत आहेत.



**गणपती बप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या**

गणपती बप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या च्या जयघोषात सोलापूरकरांनी लाडक्या गणरायाला गुरूवारी निरोप दिला. कंबर तलाव येथे गणेशाचे विसर्जन करण्यासाठी भक्तांनी गर्दी केली होती.

## उजनीची वाटचाल पन्नाशीकडे

सुराज्य/सोलापूर

सोलापूर शहर आणि जिल्ह्याची वरदायिनी असलेल्या उजनी धरणाची वाटचाल अर्धशतकाकडे सुरू झाली आहे. चार दिवसांपूर्वी दौंडमधून विसर्ग मंदावल्यानंतर सोलापूर जिल्ह्यातून काळजी व्यक्त होत होती परंतु गेल्या दोन दिवसात दौंडमधून धरणात येणारा विसर्ग वाढला आहे.

शुक्रवारी सायंकाळी सहापर्यंत मिळालेल्या आकडेवारीनुसार दौंडमधून २० हजार १०४ क्युसेकचा समाधानकारक विसर्ग येवून मिसळत आहे. धरणातील प्लसमधील पाण्याची पातळी ३० टक्क्यांच्या पुढे गेली आहे. धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पडत असलेला पाऊस तसेच पुणे जिल्ह्यातील उजनीच्या वर असलेल्या धरणांमधून पाणी सोडण्यात आल्याने त्याचा लाभ उजनीला होतो आहे. हा विसर्ग असाच राहिल्यास किंवा वाढल्यास उजनीची वाटचाल अर्धशतकाकडे व्हायला लागेल. पुण्यात शनिवारी अतिवृष्टी होण्याचा इशारा हवामान खात्याकडून देण्यात आला आहे.जर निसर्गाची कृपा झाली तर दौंडमधून आणखी विसर्ग वाढू शकतो. धरण ७० टक्के



भरल्याखेरीज शेतीला पाणी देता येणार नाही,असे जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले आहे.अवर्षण स्थितीत धरणांमधील पाणी केवळ पिण्यासाठीच राखून ठेवण्याचे राज्यासाठीचे धोरण आहे. तेव्हा उजनीची यंदाची अवस्था पाहून सोलापूर जिल्ह्यातील बागायतदार शेतकरी चिंतेत होते. वरूणराजाची कृपा होवून उजनीने शतक गाठावे, अशी प्रार्थना शेतकऱ्यांमधून होते आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




हवामान खात्याचे अंदाज नेहमी प्रमाणे फोल, आता तुम्हीच सांगा!

कल्याण
570-28-288

मुंबई
269-77-368

# तुरुंगातून सुटण्यासाठी भुजबळांनी शरद पवार यांना केले ब्लॅकमेल

## मोहोळचे माजी आमदार रमेश कदम यांचा गौप्यस्फोट

सुराज्य/पंढरपूर

छगन भुजबळ यांनी तुरुंगातून सुटण्यासाठी शरद पवारांना ब्लॅकमेलिंग केल्याचा धक्कादायक गौप्यस्फोट मोहोळचे माजी आमदार रमेश कदम यांनी केलेला आहे . सोबतच आता तुरुंगातून बाहेर आल्यानंतर भुजबळ आजारी पडत नाहीत. ते एकदम फिट आहेत. असेही माजी आमदार कदम म्हणाले. ते पंढरपूरात दौऱ्यावर असताना पत्रकार परिषदेत बोलत होते.

अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळामध्ये ३०० कोटींचा घोटाळा केल्याचा कदम यांच्यावर आरोप आहे. उच्च न्यायालयाने गेल्या महिन्यात श्री रमेश कदम यांची जामिनावर सुटका केलीय. या सुटकेनंतर कदम हे राजकारणात पुन्हा सक्रिय झाले असून आपल्या मोहोळ विधानसभा मतदासंघाचा गावभेट दौरा त्यांनी सुरु केला आहे. या गावभेट दौऱ्यादरम्यान त्यांनी आज पंढरपूर मध्ये येवून श्री विठ्ठल रखुमाईचे दर्शन घेतले.

आपल्यापेक्षा मोठे घोटाळे करणारे जेल मधून बाहेर पडले आपल्याला आठ वर्षे का लागली? असा प्रश्न केला असता कदम म्हणाले, कथित घोटाळ्याच्या आरोपात आठ वर्षे जेल भोगलेला मी एकमेव व्यक्ती आहे. देशात आणि महाराष्ट्रात कोट्यवधीं रुपयांचे घोटाळे झाले. ज्यांच्यावर आरोप झाले ते लोक काही महिन्यात तर काही एकदोन वर्षात जामिनावर बाहेर पडल्याचा इतिहास आहे. छगन भुजबळ यांच्यावर देखील मोठ्या भ्रष्टाचाराचा आरोप होता. त्यांना अटक केल्यानंतर ते माझ्याच जेल मध्ये होते. पावणेदोन वर्षे आम्ही एका जेल मध्ये होतो. जेलमधून सुटका करुन घेण्यासाठी भुजबळ हे रोज नव्या नव्या आजाराची कारणे शोधायचे पण त्यांना जामीन काही मिळत नव्हता.



जेल मधून बाहेर पडण्यासाठी ते अगदी काकुळतीला यायचे. काही केल्या जमीन काही मिळत नाही हे लक्षात आल्यावर त्यांनी पक्षाला व पक्षातील नेत्यांना ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली. मला बाहेर काढा नाहीतर मला वेगळा मार्ग स्वीकारावा लागेल अशी धमकि त्यांनी नेत्यांना दिली. तेंव्हा कुठे यंत्रणा हलली आणि भुजबळ जामिनावर बाहेर आले. जेल मध्ये असताना भुजबळ रोज आजारी पडायचे आता तसे काही दिसत नाहीत उलट ते सो फिट असल्याचा टोला कदम यांनी लगावला.

### माझ्यावरचे आरोप शासकीय यंत्रणेच्या द्वेषातून

माझ्यावर झालेले भ्रष्टाचाराचे आरोप हे राजकीय आणि शासकीय यंत्रणेच्या द्वेषातून झालेले आहेत. मी एक रुपयाचा घोटाळा केलेला नाही. हे मी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले आहे. माझ्या पक्षातील आणि काही विरोधकांनी माझे विरुद्ध रचलेले हे कुंभाड आहे. पोलिसांनी माझे विरुद्ध गुन्हा दाखल केला असला तरी ते सिद्ध करु शकले नाहीत. मात्र या आरोपातून मुक्त होण्यासाठी आठ वर्षे जेलच्या नरकयातना सोसाव्या लागल्या आहेत, असेही कदम म्हणाले.

### लोकांशी बोलून मी राजकीय भूमिका घेणार

मोहोळ विधानसभा मतदार संघातून निवडणूक लढण्यास मी पुन्हा इच्छुक आहे. गावभेट दौरा करुन लोकांची मत जाणून घेवून मी माझी राजकीय भूमिका जाहीर करणार आहे. लोकांचा मला उदंड प्रतिसाद आहे. अनेक पक्षांचे मला पक्षात येण्यासाठी निमंत्रण आहे. सद्या मी कोणत्याही पक्षात नाही. मतदासंघांतील लोकांशी बोलून मी राजकीय भूमिका घेणार असल्याचे कदम यांनी सांगितले. याप्रसंगी पंढरपूरचे माजी नगरसेवक कृष्णा वाघमारे, दिलीप देवकुळे आदी उपस्थित होते.